महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.५६९/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ५१९ दिनांक २० / १० / २०१५

**विषय :** म.रा.वि.वि.कं.मर्या. मधील कर्मचाऱ्यांना ०१ जानेवारी २०१५ पासून सुधारित दराने महागाई भत्ता देण्याबाबत.

**वाचा :** १) प्रशासकीय परिपत्रक क्र.५०० दि.१२.०२.२०१५
२) शासन निर्णय क्र. मभवा- २०१५/प्र.क्र.४२/सेवा-९, दि. १५.१०.२०१५

.....................

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचाऱ्यांसाठी सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला जातो.

२. आता वित्त विभाग, शासन निर्णय क्र. मभवा- २०१५/प्र.क्र.४२/सेवा-९ दि. १५.१०.२०१५ अन्वये महाराष्ट्र शासनाने, शासनाच्या सर्व पात्र पूर्वकालीन कर्मचाऱ्यांना ०१ जानेवारी २०१५ पासून सुधारित वेतन संरचनेतील मुळ वेतनावरील (वेतन बँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय असलेला महागाई भत्त्याचा दर १०७% वरून ११३% केला आहे. तसेच दि. ०१ ऑक्टोबर २०१५ पासून सदर महागाई भत्त्याची रक्कम अदा करण्यात यावी व दिनांक ०१ जानेवारी २०१५ ते ३० सप्टेंबर २०१५ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीच्या आहरणाबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील असेही आदेश पारीत केलेले आहेत.

३. आता शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं.मर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना त्यांचे मुळ वेतनावर **१०७ %** ऐवजी **११३ %** अशा सुधारित दराने दि. ०१ जानेवारी २०१५ पासून महागाई भत्ता देण्याबाबत व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) आणि संचालक (प्रकल्प) यांच्याशी विचार विनिमय करुन मंजुरी प्रदान केली आहे. तसेच सुधारित दरानुसार महागाई भत्त्याची रक्कम महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना माहे **ऑक्टोंबर २०१५** पासूनच्या वेतनामध्ये समाविष्ट करून देण्यात यावी.

४. उपरोक्त सुधारित दराने द्यावयाच्या दिनांक ०१ जानेवारी २०१५ ते ३० सप्टेंबर २०१५ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत शासन निर्णयानुसार स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**( संदेश हाके )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\D.A-Adm.Circular*